## L. A. BILL No. XX OF 2021.

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २०.

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;



एचबी १५३५-१

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०. २०२१ चा महा. अध्या. ६.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त आदेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५अ ची सुधारणा.

१८८८ चा ३.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५अ च्या पोट-कलम (४) मधील, खंड (अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(अ) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, महानगरपालिकेतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, महानगरपालिकेतील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही ;".

प्रकरण तीन

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५अ ची सुधारणा.

१९४९ चा ५९.

**३.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५अ च्या पोट-कलम (१) मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, महानगरपालिकेतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, महानगरपालिकेतील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही आणि अशा जागा, महानगरपालिकेतील विविध प्रभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

परंतु, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश जागा, नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;".

प्रकरण चार

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.**

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९ ची सुधारणा.

१९६५ चा महा. ४०.

**४.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ९ च्या पोट-कलम (२) मधील, खंड (ड) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ड) नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, नगरपरिषदेतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, नगरपरिषदेतील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांश जागा, नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.".

प्रकरण पाच

## संकीर्ण

२०२१ चा महा. अध्या. ६.

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

**५.** (१) मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ɤ

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) याचे कलम ५अ (४) (अ) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याचे कलम ५अ(१)(क) आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याचे कलम ९(२)(ड) यांमध्ये, अनुक्रमे महानगरपालिका आणि नगरपरिषदा यांमध्ये नागरिकांच्या मागास वर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी जागा राखून ठेवण्यासाठी तरतूद आहे. उक्त अधिनियमांमध्ये महानगरपालिका आणि नगरपरिषदा यांमध्ये नागरिकांच्या मागास वर्गासाठी थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्के इतक्या आरक्षणाची तरतूद होती.

२. राज्य निवडणूक आयोगाने, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागास वर्गाचा प्रवर्ग यांमधील व्यक्तींसाठी आरक्षणाची तरतूद करण्यासाठी दिनांक २७ जुलै २०१८ व दिनांक १४ फेब्रुवारी २०२० रोजीच्या अधिसूचना व इतर अधिसूचना काढल्या होत्या, आणि त्यानुसार, राज्य निवडणूक आयोगाने, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या निवडणुका घेतलेल्या आहेत.

३. महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम १२(२)(क) यांच्या तरतुदी आणि राज्य निवडणूक आयोगाने, वाशिम, अकोला, नागपूर व भंडारा या जिल्ह्यांच्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्याबाबतीत ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षणाची तरतूद करणाऱ्या, दिनांक २७ जुलै २०१८ व दिनांक १४ फेब्रुवारी २०२० रोजी काढलेल्या अधिसूचनांविरोधात **विकास किसनराव गवळी विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर [रिट याचिका (दिवाणी) क्रमांक २०१९ ची ९८०]** यामध्ये सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

सर्वोच्च न्यायालयाने, त्याच्या दिनांक ४ मार्च २०२१ च्या आदेशान्वये, उक्त अधिसूचना, अवैध व कायद्याच्या दृष्टीने अस्तित्त्वात नसणाऱ्या, इतर मागास वर्गाच्या जागांच्या आरक्षणासाठी तरतूद करतात त्या मर्यादेपर्यंत, त्या अधिसूचना रद्दबातल केल्या आहेत आणि या निर्णयामुळे रिक्त झालेल्या जागा, त्याबाबतीत अधिसूचना काढून, संबंधित स्थानिक संस्थेच्या उर्वरित मुदतीसाठी सर्वसाधारण/खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांमधून राज्य निवडणूक आयोगाकडून तात्काळ भराव्यात असा निर्णय दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने असाही निर्णय दिला आहे की, संबंधित स्थानिक संस्थामधील इतर मागासवर्गाच्या बाबतीतील आरक्षण, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्ग यांच्यासाठी एकत्रितपणे राखून ठेवलेल्या एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही इतक्या मर्यादेपर्यंत अधिसूचित करता येऊ शकेल.

४. उक्त न्यायनिर्णयाच्या परिच्छेद १२ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, इतर मागासवर्गासाठी स्थानिक संस्थांमध्ये जागा राखून ठेवण्यापूर्वी राज्याने पुढील प्रमाणे तिहेरी चाचणीचे/शर्तींचे अनुपालन करण्याची आवश्यकता आहे :—(१) राज्यामधील स्थानिक संस्थानिहाय मागासलेपणाचे स्वरूप व परिणाम यांची समकालीन सखोल चौकशी करण्यासाठी समर्पित आयोग स्थापन करणे, (२) आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन, स्थानिक संस्थानिहाय तरतूद करण्याची आवश्यकता असलेल्या आरक्षणाचे प्रमाण विनिर्दिष्ट करणे, जेणेकरून, मोठ्या प्रमाणात चूक होणार नाही, आणि (३) कोणत्याही परिस्थितीत, असे आरक्षण, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्ग यांच्यासाठी एकत्रितपणे राखून ठेवलेल्या एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

उक्त न्यायनिर्णयानुसार, शासनाने, उक्त काम, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५ (२००६ चा महा. ३४) अन्वये घटित केलेल्या महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे सोपवलेले आहे. आयोगाला, उक्त प्रयोजनासाठी समकालीन सखोल चौकशी करण्याकरिता वाजवी वेळ लागेल.

५. उक्त न्यायनिर्णयामधील परिच्छेद २८ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, १९६१ च्या अधिनियमाच्या कलम १२(२)(क) च्या वैधतेला दिलेले आव्हान निरर्थक ठरले आहे. त्याऐवजी, ती तरतूद

या अर्थाने वाचण्यात यावी की, संबंधित स्थानिक संस्थांमधील इतर मागास वर्गाच्या बाबतीतील आरक्षण, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्ग यांच्यासाठी एकत्रितपणे राखून ठेवलेल्या एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही इतक्या मर्यादेपर्यंत अधिसूचित करता येतील. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, या न्यायालयाच्या घटनापीठाने प्रतिपादन केल्याप्रमाणे, कलम १२(२)(क) मध्ये येणाऱ्या २७ टक्क्यांइतक्या "असतील" या संज्ञेच्या अन्वयार्थ, "असू शकतील" असा लावण्यात येईल आणि त्यात, एकत्रितपणे अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्ग यांच्या एकूण ५० टक्क्यांच्या बाह्यमर्यादेस अधीन राहून, इतर मागास वर्गाचे आरक्षण २७ टक्क्यांपर्यंत असू शकेल अशा अर्थाचा अंतर्भाव असेल.

६. उक्त न्यायनिर्णय लक्षात घेता, इतर मागास वर्गास स्थानिक संस्थांमध्ये आरक्षण राहिलेले नाही. स्थानिक संस्थांमध्ये, इतर मागास वर्गांना प्रतिनिधित्व देण्याकरिता, शासनाने, दरम्यानचा उपाय म्हणून, महानगरपालिका आणि नगरपरिषदा यांमध्ये नागरिकांच्या मागास वर्गांच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी जागांच्या २७ टक्क्यांपर्यंत आरक्षणाची तरतूद करण्याचे, आणि एकूण आरक्षण, स्थानिक संस्थांमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद करण्याचे ठरविलेले होते. म्हणून, मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५अ(४)(अ), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५अ(१)(क) आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याचे कलम ९(२)(ड) यांमध्ये यथोचित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

७. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१ (२०२१ चा महा. अध्या. ६), हा प्रख्यापित केला होता.

८. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१.

**एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.

## सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक २० - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट.

**(मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यातील उतारे)**

**(सन १८८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३)**

**१.** ते **५.** ** ** **

**५अ.** (१) ते (३) ** ** ** जागा राखून ठेवणे.

(४) (अ) प्रत्यक्ष निवडणुकींद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येपैकी, सत्तावीस टक्के जागा नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(ब) ** ** **

(५) ते (७) ** ** **

५ (ब) ** ** **

**६.** ते **५२८.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ यातील उतारे)**

**(सन १९४९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९)**

**१.** ते **५.** ** ** **

**५अ.** (१)(अ) व (ब) ** ** ** जागा राखून ठेवणे.

(क) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, महानगरपालिकेमधील, निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या सत्तावीस टक्क्याइतक्या असतील आणि अशा जागा महानगरपालिकेतील वेगवेगळ्या निवडणूक प्रभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

परंतु अशा रीतीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या [४][एक-द्वितीयांश] जागा नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(ड) व (ई) ** ** **

(२) ** ** **

**५ब.** ** ** **

**६.** ते **४९३.** ** ** **

**(महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यातील उतारे)**
**(सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०)**

**१.** ते **८.** ** ** **

नगरपरिषदांची घडण. **९.** (१) ** ** **

(२) संचालकाने, वेळोवेळी, प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी **राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे,—

(अ) ते (क) ** ** **

(ड) प्रत्येक वर्गातील परिषदेच्या नगरपालिका क्षेत्राच्या बाबतीत नागरिकांच्या मागासवर्गासाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागांची संख्या ही, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, १९९३ याच्या प्रारंभानंतर घेण्यात येणाऱ्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात यावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या सत्तावीस टक्के इतकी असेल :

परंतु, अशा प्रकारे जागा राखून ठेवताना, राखून ठेवावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या एक द्वितीयांश जागा नागरिकांच्या मागासवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(३) ** ** **

(४) ** ** **

**१०.** ते **३५१.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २०.]**

**[मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.**]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.